# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०९/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## बुट्टीबोरी हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू बाळगणाऱ्या इसमांवर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. ०६/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे बुटीबोरी हद्दीतील मौजा आसोला पारधी बेडा परिसरात अवैधरीत्या मोहफुल गावठी दारू व मोहफुल सडवा बाळगणे बाबतच्या एकूण २ इसमांवर कार्यवाही करण्यात आल्या. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु व मोहफुल सडवा बाळगणारे १) मुरलीधर देविदास चव्हान, वय ३९ वर्ष, रा. असोला शिवार पारधी टोला नागपुर २) महिला आरोपी यांचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता मोहफुल गावठी दारू व मोहफुल सडवा बाळगताना मिळुन आले. आरोपी क्र. १) यांचे ताब्यातून एका प्लॅस्टिक डबकित २० लिटर मोहफुल गावठी दारू प्रमाणे एकूण १०००रु. २) ८०० लिटर मोहफुल सडवा रसायन की १६००० एकूण १७,०००/— रू चा मुद्देमाल तसेच आरोपी क्र. ०२) हिचे ताब्यातून १२०० लिटर मोहफुल सडवा रसायन किंमती २४०००/— रू चा मुद्देमाल दोन्ही आरोपीतांकडुन असा एकुण ४१,०००/—रू. चा मुद्देमाल मिळून आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बोरी यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५(ई) (फ), महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि किशोर शेरकी, HC मिलिंद नांदुरकर, HC रोशन काळे, HC रोहन डाखोरे, WHC कविता बचले, Npc वीरेंद्र नरड, Pc अमित मेहरे, Pc देवा देवकते, DHC अमोल कुथे यांनी पार पडली.

## पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मॉक ड्रील

आगामी सन उत्सवाच्या अनुशंगाने पोलीस स्टेशन काटोल येथे आज दिनांक ०७/०९/२०२४ रोजी १२.४५ वा. ते १३.५० वा. पोवेतो पोलीस स्टेशनचे ०४ अधिकारी, २२ अंमलदार व १६ सैनिक तसेच पोलीस मुख्यालय येथुन RCP पथक सह पेठ बुधवार सुभाष चौक येथे मॉक ड्रिल करण्यात आले.

सदर मॉक ड्रील ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहम सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोनि निशांत मेश्राम यांनी घेतली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर